तरुण भारत

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांना अभिवादन

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील मुख्य इमारतीच्या प्रागंणामध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती साजरी करण्यात आली.

प्र – कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, मच्छिंद्र गोफणे, अधीष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे डॉ. रामचंद्र पवार, विद्यार्थी विकास विभागाचे प्रभारी संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, सुरेश बंडगर, अविनाश भाले, शरद पाटील, सुरेश मोरे आदी उपस्थित होते.



कोल्हापूर : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करताना डॉ. प्रमोद पाटील, डॉ. विलास शिंदे, डॉ. श्रीकृष्ण महाजन, मच्छिंद्र गोफणे, रामचंद्र पवार आदी.

लोकमत

# शिवाजी विद्यापीठात पुण्यश्लोक होळकर जयंती उत्साहात

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात बुधवारी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती साजरी करण्यात आली. विद्यापीठाचे प्र - कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते अहिल्यादेवींच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात येऊन अभिवादन केले. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे मच्छिंद्र गोफणे, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. रामचंद्र पवार विद्यार्थी विकास विभागाचे प्रभारी संचालक डॉ. प्रकाश गायकवाड सुरेश बंडगर, अविनाश भाले, शरद पाटील, सुरेश मोरे आदी उपस्थित होते.

पुण्यनगरी

# अहिल्यादेवी होळकर यांना विद्यापीठात अभिवादन

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठात आज मुख्य इमारतीच्या प्रागंणामध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती साजरी करण्यात आली. विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, मच्छिंद्र गोफणे, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. प्रकाश गायकवाड, सुरेश बंडगर, अविनाश भाले, शरद पाटील, सुरेश मोरे आदी उपस्थित होते.

तरूण भारत

# खेलो इंडियामध्ये विजय डोईफोडेला सुवर्णपदक

वार्ताहर
मुरगूड

येथील लोकनेते सदाशिवराव मंडलिक राष्ट्रीय साई कुस्ती संकुलचा मल्ल, डॉर्फ केटल ग्रुपचा दत्तक कुस्तीगीर व सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयाचा विद्यार्थी विजय डोईफोडे याने वाराणसी (उत्तर प्रदेश) येथे सुरू असलेल्या खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम्स कुस्ती स्पर्धेत सुवर्ण पदकाची कमाई केली. शिवाजी विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करत ८७ किलो वजन गटांमध्ये त्याने या यशाला गवसणी घातली.

हरियाणाच्या डी. बी. युनिव्हर्सिटीच्या राकेशला समोरून फ्रंट सालतो हा डाव मारून चिटपट करून विजयने विजयी सलामी दिली. पीएएचएस युनिव्हर्सिटीच्या शुभमला बगल डूब करून सलग दोनवेळा बॅक थ्रो या डावाचा वापर करत १०-०० गुण मिळवून एकतर्फी कुस्ती जिंकल्यामुळे विजयला अंतिम फेरीचा दरवाजा खुला झाला.

सुवर्णपदकासाठीच्या लढतीमध्ये कुरुक्षेत्र युनिव्हर्सिटीच्या अजित कुरुक्षेत्र बरोबर झालेल्या अटीतटीच्या लढतीत १०-०४ ने अजितला पराभूत करून विजयने सुवर्णपदकावर नाव कोरले.



**वाराणसी : खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम्स कुस्ती स्पर्धेत सुवर्ण पदकाची कमाई करणाऱ्या विजय डोईफोडेसोबत कोच दादासो लवटे.**

आंतरराष्ट्रीय कुस्ती कोच दादासो लवटे, वस्ताद सुखदेव येरुडकर, डॉ. महेंद्र कदम-पाटील, डॉ. ए. व. आवळे, डॉ. शिवाजी पोवार, दयानंद खतकर, सागर देसाई यांचे मार्गदर्शन तर खासदार संजय मंडलिक, विरेंद्र मंडलिक, साईचे राज्य समन्वयक चंद्रकांत चव्हाण, कार्यवाह आण्णासो थोरवत, प्राचार्य डॉ. अर्जुन कुंभार, डॉ. प्रशांत आथणी यांचे प्रोत्साहन त्याला मिळत आहे.

तरूण भारत




कोलोली : श्रीपतराव चौगुले कॉलेजचा विद्यार्थी पैलवान अक्षय मंगवडे

# पैलवान अक्षय मंगवडे खेलो इंडीयाचा रौप्य पदकाचा मानकरी

**कोलोली :** माळवाडी/कोतोली ता. पन्हाळा येथील श्रीपतराव चौगुले आर्ट्स ॲण्ड सायन्स कॉलेजचा विद्यार्थी महाराष्ट्र केसरी पैलवान अक्षय मंगवडे यांने काशी हिंदू विश्वविद्यालय, वाराणसी (उत्तर प्रदेश) येथे दिनांक २६ मे २०२३ ते दिनांक २९ मे २०२३ रोजी पार पडलेल्या खेलो इंडीयामध्ये रौप्य पदक प्राप्त केले.

ज्ञानगंगा शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक, अध्यक्ष व जिल्हा परिषदेचे माजी बांधकाम सभापती डॉ. के. एस. चौगुले, सचिव शिवाजीराव पाटील, संचालक डॉ. अजय चौगुले, प्रभारी प्राचार्य डॉ. व्ही. पी. पाटील, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष समन्वयक डॉ. बी. एन. रावण, जिमखाना विभाग प्रमुख डॉ. यु. एन. लाड यांचे मार्गदर्शन लाभले.

तरूण भारत

# खेलो इंडिया स्पर्धेत अक्षय मंगवडेने पटकावले रौप्यपदक

**कोलोली :** माळवाडी, कोतोली (ता. पन्हाळा) येथील श्रीपतराव चौगुले आर्टस् ॲण्ड सायन्स कॉलेजचा विद्यार्थी महाराष्ट्र केसरी पै. अक्षय मंगवडे याने काशी हिंदू विश्वविद्यालय, वाराणसी (उत्तर प्रदेश) येथे २६ ते २९ मे दरम्यान पार पडलेल्या खेलो इंडिया-२०२३ स्पर्धेत रौप्य पदक प्राप्त केले. त्याला ज्ञानगंगा शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष व जि. प.चे माजी बांधकाम सभापती डॉ. के. एस. चौगुले, सचिव शिवाजीराव पाटील, संचालक डॉ. अजय चौगुले, प्र. प्राचार्य डॉ. श्रीमती व्ही. पी. पाटील, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष समन्वयक प्रा. डॉ. बी. एन. रावण, जिमखाना विभाग प्रमुख प्रा. डॉ. यु. एन. लाड यांचे मार्गदर्शन लाभले.




पैलवान अक्षय मंगवडे खेलो इंडीयाचा रौप्य पदकाचा मानकरी.